अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.: अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/२८२४
दिनांक :- २८/०७/२०२०

## -: आदेश :-

विषय :- श्री. वैभव कडलख, महापालिका सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग यांचे कालावधीत त्यांचेकडील पदाच्या कामकाज व्यवस्थेबाबत.
संदर्भ :- हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय जा.क्र. १७०६, दि. २७/०७/२०२०.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील श्री. वैभव कडलख, महापालिका सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग यांनी त्यांचे वडील बंधु श्री. बाळासाहेब कडलख यांचे आकस्मित निधन झाल्याने त्यांचे घरी धार्मिक विधीचे कार्यक्रमाकरिता व त्यांची तब्येत ठीक नसलेने दि. २७/०७/२०२० ते ३१/०७/२०२० अखेर हक्काची रजा मिळणेस संदर्भांकित अर्जान्वये विनंती केली आहे. त्यास मा.महापालिका आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

श्री. वैभव कडलख यांचे रजा कालावधीत त्यांचेकडील महापालिका सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग या पदाचा अतिरिक्त पदभार श्री. निलेश देशमुख, महापालिका सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग यांचेकडे व महापालिका सहाय्यक आयुक्त, हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय या पदाचा अतिरिक्त पदभार श्री. लहाणे विक्रम, उप अभियंता (स्थापत्य), हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय यांचेकडे सोपविणेत येत आहे.

उपरोक्त अधिकारी यांनी स्वत:चे पदाचे कामकाज सांभाळून उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त कामकाज करावयाचे आहे, तसेच अतिरिक्त पदभार स्विकारलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :- खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका
यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी . . .